अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
यांचे कार्यालय, पुणे महानगरपालिका
जावक क्र.:-अतिमआ(ज.)/एलओ/ २०६
दिनांक :- २८/५/१६

## – कार्यालयीन परिपत्रक –

**विषय :-** मा.लाड/पागे समितीच्या शिफारशीनुसार घाणभत्ता वारस हक्क व अनुकंपा तत्वानुसार नियुक्ती देणेबाबत.

पुणे महानगरपालिकेच्या कायम आस्थापनेवरील सफाई सेवकांचे वयोपरत्वे सेवानिवृत्ती/ऐच्छिक सेवानिवृत्ती/ शारिरीकदृष्टया अपात्रतेच्या कारणास्तव सेवानिवृत्त/सेवेत असताना मयत इ. कारणास्तव रिक्त झालेल्या जागी त्यांचे एका पात्र वारसास मा.लाड/पागे समितीच्या शिफारशीनुसार मे.शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार **घाण भत्ता वारस हक्काने** नियुक्तीची कार्यवाही करण्यात येते.

तसेच पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ मधील सेवकाचे सेवेत असताना निधन झाल्यानंतर त्यांचे एका पात्र वारसाची **अनुकंपा तत्वानुसार** नियुक्तीची कार्यवाही शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात येते.

सदरच्या नियुक्त्या विहित मुदतीत करणेबाबत मे.शासनाने वेळोवेळी आदेश निर्गमित केले आहेत. सफाई सेवकाचे सेवानिवृत्ती /ऐच्छिक सेवानिवृत्ती/शारिरीकदृष्टया अपात्रतेच्या कारणास्तव सेवानिवृत्त/सेवेत असताना मयत इ. चे व वर्ग-३ व वर्ग-४ मधील सेवकाचे सेवेत असताना निधन झाल्याचे दिनांकापासून ०१ (एक वर्ष) वर्षाचे आंत त्याचे पात्र वारसाने **घाण भत्ता वारस हक्क तत्वानुसार व अनुकंपा तत्वानुसार** नोकरी मागणी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

मा. लाड/पागे समितीच्या शिफारशीनुसार **घाण भत्ता वारस हक्क** व **अनुकंपा तत्वानुसार** नियुक्ती बाबतच्या कागदपत्रामध्ये सुसुत्रता येणेसाठी व प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होणेसाठी आवश्यक कागदपत्रांची वर्गवारी करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित खाते, सेवक व वारस यांनी कोणती कागदपत्रे सादर करावयाची आहेत, याबाबतची यादी सोबत समाविष्ट करण्यात आली आहे.

खात्याशी संबंधित असलेली कागदपत्रांची पूर्तता खात्यानेच करावयाची आहे. सदर कागदपत्रांची मागणी सेवक अगर वारस यांचेकडे करण्यात येवू नये.

नोकरी मागणी अर्ज विहित मुदतीत व सोबतच्या यादीनुसार कागदपत्रे सादर करणेविषयी सेवक/ त्यांचे कुटुंबियास लेखी कळविणेची जबाबदारी, सेवक ज्या कार्यालयाकडे अंतिम वेतनास आहे त्या क्षेत्रिय कार्यालय/ विभागाची राहील.

F:\snehal\bakshi \ Paripatrak

वरील कार्यपध्दतीची काटेकोरपणे व परिणामकारक अंमलबजावणी करणेबाबत संबंधित सर्व मा.खाते प्रमुख यांनी संबंधित जबाबदार सेवकांना सूचित करावे.

सदर कार्यालयीन परिपत्रकाची अंमलबजावणी करणेस कुचराई केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित सेवकांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

कळावे,

(राजेंद्र जगताप)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
पुणे महानगरपालिका

प्रत :-
सर्व खाते प्रमुख/क्षेत्रिय कार्यालय/विभाग
पुणे महानगरपालिका

| अनुकंपा नियुक्तीसाठी सादर करावयाची कागदपत्रे | घाणभत्ता नियुक्तीसाठी सादर करावयाची कागदपत्रे |
|---|---|
| **खात्याने सादर करावयाची कागदपत्रे :-**<br>१. निवेदन<br>२. प्रपत्र फॉर्म<br>३. रिक्त जागेचा तक्ता<br>४. वारस चौकशी अहवाल<br>५. सेवापुस्तकाचे पहिल्या व दुस-या पानाची प्रत (प्रथम व अंतिम नियुक्तीचा हुद्दा नोंद असलेली)<br>६. अंतिम महिन्याची पगार पावती<br>७. नगर अभियंता (आस्थापना) विभागाकडील रोजंदारी सेवेत नसलेबाबतचा दाखला.<br>८. रिक्त जागेची माहिती<br>९. सेवकाची निर्दोष सेवा झाल्याबाबतचा दाखला<br>१०. परिशिष्ठ "ब" भाग - १ व २ ची प्रत.<br>११. मयत सेवकाचे कुटुंबियांस पात्र वारसांनी नोकरी मागणी अर्ज व आवश्यक कागदपत्रे १ वर्षाचे आत सादर करणे आवश्यक असल्याबाबत कळविलेल्या पत्राची प्रत. | **खात्याने सादर करावयाची कागदपत्रे :-**<br>१) निवेदन<br>२) प्रपत्र फॉर्म<br>३) रिक्त जागेचा तक्ता<br>४) वारस चौकशी अहवाल/प्रत्यक्ष वारस चौकशी<br>५) सेवकाबाबत ५ मुद्दयांचा दाखला- (कार्यालयीन परिपत्रक जा.क्र.उआसे/प्र-९/४९२६ दि.०२/१२/२०१४) (सेवकास अर्जाची मुदत कळविलेची बाबत, ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीत गैरहजर, खातेनिहाय चौकशी, सेवाकालावधीत खातेनिहाय कार्यवाही/ चौकशी,५ वर्षापेक्षा कमी दिर्घकाल विनापरवाना गैहजर)<br>६) सेवानिवृत्त/ऐच्छिक सेवानिवृत्त/शारिरीक कारणास्तव अपात्र याचे पत्र.<br>७) सेवापुस्तकाचे पहिल्या व दुस-या पानाची प्रत (घाण भत्ता व हुद्दा नोंद असलेली)<br>८) अंतिम महिन्याची पगार पावती (घाण भत्ता नोंद असलेली)<br>९) सेवक/वारसास नोकरी मागणी अर्ज व आवश्यक कागदपत्रे १ वर्षाचे आत सादर करणे आवश्यक असल्याबाबत कळविलेल्या पत्राची प्रत. |

F:\snehal\bakshi \ Paripatrak

| अनुकंपा नियुक्तीसाठी सादर करावयाची कागदपत्रे | घाणभत्ता नियुक्तीसाठी सादर करावयाची कागदपत्रे |
|---|---|
| **<u>प्रस्तावित वारसाने सादर करावयाची कागदपत्रे</u>**<br>१) सेवकाचा मयत दाखला (मूळ प्रत)<br>२) मयत सेवकाचे ओळखपत्र<br>३) नोकरी मागणी अर्ज<br>४) जन्म दिनांका बाबत दाखला (शाळा सोडल्याचा/ जन्म दाखला)<br>५) शैक्षणिक पात्रतेबाबत अंतिम गुणपत्रिका.<br>६) जातीचा दाखला.<br>७) उत्पन्नाचा दाखला (केवळ नोकरी प्रयोजनार्थ अशी नोंद आवश्यक)<br>८) अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र, अपत्यांचे जन्म दाखले<br>९) अन्य वारसांचे संमतीपत्र व जन्म दाखले (मयत असलेल्या वारसांचे मृत्यु दाखले)<br>१०) सद्यकाळातील वारस उमेदवाराचे फोटो (२० फोटो काढून ठेवणे)<br>११) शिधापत्रिका | **<u>सेवकाने सादर करावयाची कागदपत्रे</u>**<br>१) ओळखपत्र<br>२) प्रतिज्ञापत्र<br>**<u>प्रस्तावित वारसाने सादर करावयाची कागदपत्रे</u>**<br>१) नोकरी मागणी अर्ज.<br>२) सेवक मयत असल्यास मयत दाखला.<br>३) प्रतिज्ञापत्र (बंधपत्र) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र, अपत्यांचे जन्म दाखले.<br>४) सद्यकाळातील वारस उमेदवाराचे फोटो (२० फोटो काढून ठेवणे)<br>५) शिधापत्रिका<br>६) जन्म दिनांका बाबत दाखला (शाळा सोडल्याचा/ जन्म दाखला)<br>७) सेवक मयत असल्यास अनुकंपा हक्क सोडल्याचा अर्ज<br>८) सेवक मयत असल्यास अन्य पात्र वारसांचे संमतीपत्र, पात्र वारसामधील कोणी मयत असल्यास त्यांचे मृत्यु दाखले |

F:\snehal\bakshi \ Paripatrak